# दशकपूर्ती भारतीय मुस्लीम महिला आंदोलनाची

ज. शं. आपटे



भारतात मुस्लीम समाज हा लक्षणीय अल्पसंख्य समाज आहे. ह्या समाजाचे भारतीय स्वातंत्र्यासाठीच्या लढ्यात सहभाग व योगदान लक्षात ठेवण्याजोगे होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ह्या समाजाच्या प्रगतीकडे, विकासासाठी पुरेसे आवश्यक नियोजनबद्ध प्रयत्न केले गेले नाहीत. त्यामुळे मुस्लीम समाज शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, आरोग्य क्षेत्रात सातत्याने मागासलेला दुरवस्थेच्या परिस्थितीत राहिला. मुस्लीम स्त्रीचे दुःख, अवहेलना, दुर्भाग्य कमालीचे होते व अद्यापही ते फारसे कमी झाले नाही. ह्या परिस्थितीस कारणीभूत जसे ह्या समाजाचे नेते, पुढारी, कार्यकर्ते, संस्था-संघटना आहेत तसेच गेल्या ६५-७० वर्षांतील केंद्रशासन व राज्यातील सत्तेतील पक्षही जबाबदार आहेत. केंद्रातील यूपीए-१ शासनाने न्या. सच्चर यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेला आपला अहवाल २००६ मध्ये शासनाला सादर केला त्याला दहा वर्षे पुरी झाली आहेत. अहवालात मुस्लीम समाजाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती आकडेवारीनिशी स्पष्टपणे उजेडात आणली. दहा वर्षांनंतर मुस्लीम समाजात फारसा काहीही फरक पडला नाही. उलट ती अधिकच वाईट झाली आहे. भारतात तेव्हा २००६ मध्ये मुस्लिमांची संख्या होती लोकसंख्येच्या १४.२ टक्के. एकूण अल्पसंख्याकांमध्ये ७३ टक्के आहे. म्हणजे मुस्लीम समाज ही एक लक्षणीय अल्पसंख्याक संख्या आहे. अहवालाच्या एकूण शिफारशीपैकी फक्त १० टक्क्यांची अंमलबजावणी झाली आहे असे समितीतील विशेष कामासाठीचे अधिकारी सय्यद महमूद जाफर यांनी नुकतेच एका चर्चासत्रातील भाषणात सांगितले. शासकीय नोकऱ्यांमध्ये मुस्लिमांचे प्रमाण अगदी किमान आहे. जमाते-उलेमा-ए-हिंदचे जनरल सेक्रेटरी मौलाना महमूद मदानी ह्यांच्या मते समाजात मुस्लीम समाजाविषयी विश्वासाचा वाढता अभाव आहे. मुस्लीम सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत आहेत, एकारलेले आहेत. आजकाल मुस्लीम असणे म्हणजे दहशतीचे लक्षण मानले जाते. ज्येष्ठ अभ्यासक मनोरंजन मोहंती म्हणतात की सर्व वंचित समाज,

ईमेल : pwatsaru@yahoo.com

अल्पसंख्याकांसह ह्यासंबंधीचा पद्धतशीर अभ्यास व्हायला हवा व त्यांच्याबरोबर काम करायला हवे. वृत्तपत्रे, पुस्तके, नियतकालिके यामधून फारच थोडी माहिती - सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक - मुस्लीम समाजासंबंधी वाचायला मिळते. अल्पसंख्याक समाजाचे हक्क मानले जायला हवे आणि त्यांचे रक्षण व्हायला हवे. ते हक्क जेव्हा नाकारले जातात, त्यांना धक्का बसतो त्यांना धमकावले जाते तेव्हा हिंसक घटना घडतात, उलटपक्षी सुयोग्य प्रतिनिधित्वामुळे जेव्हा ते  जातात सत्तापदांवर जातात तेव्हा सामाजिक बदलास प्रारंभ होतो.

जमाते-इ-इस्लामिक हिंदचे मुख्य सचिव सलीम इंजिनिअर ह्यांच्या मते अहवालाची व्यापक चर्चा होऊनही तळागाळातल्या पातळीवर प्रत्यक्ष फारच कमी काम झाले आहे. हा अहवाल कृतीत उतरलाच नाही असे म्हणावयास हवे. अल्पसंख्याक मुस्लिमांच्या परिस्थितीत प्रत्यक्ष फरक फारसा झालाच नाही. शासनाला यासंबंधी खरी आस्था, आपुलकी, बांधिलकी मुळीच वाटत नाही. भारतातील कारागृहामध्ये बहुसंख्या अल्पसंख्याक मुस्लीम समाजाची आहे. एकूण ८५ टक्के मुस्लीम आहेत. 'सबका साथ, सबका विकास' ही केवळ शाब्दिक, भावनिक, वरवरची घोषणा आहे. वास्तव अगदी वेगळेच आहे. देश एकाधिकारशाहीकडे वाटचाल करीत आहे. अभिव्यक्ती, आविष्कार स्वातंत्र्यास वाव नाही. भारताची खरी ओळख आहे विविधता, बहुसांस्कृतिकता ही, संकुचित, एकारलेला हिंदू राष्ट्रवाद ही नव्हे. २००२च्या पहिल्या पूर्वार्धात गुजरातमध्ये मुख्यमंत्री नरेंद्र मोदींच्या सत्तेत भीषण, अभूतपूर्व असा नरसंहार झाला. त्याचे पडसाद देशभर उमटले. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी मुख्यमंत्री नरेंद्र मोदींना 'राजधर्म पाळा' असे जाहीरपणे सुनवावे लागले. २००४ मध्ये त्यांची केंद्रात सत्ता निवडणुकीतील पराभवामुळे गमवावी लागली तेव्हा पंतप्रधान वाजपेयी म्हणाले की Centre is lost, Gujarat has won. ह्या नरसंहारामध्ये २००० हून अधिक हिंदू-मुस्लीम पुरुषांची हत्या झाली आणि त्यामध्ये मुस्लीम स्त्री-पुरुष संख्येने अधिक होते.

त्यानंतर बदललेल्या परिस्थितीत अनेक मुस्लीम महिला कार्यकर्त्या मुंबईत, उत्तर प्रदेश, ओडिशा, कर्नाटक, राजस्थान, राजस्थान, गुजरात आदी राज्यांत सभा, चर्चा, मुस्लीम महिलांची स्थिती, नागरी हक्क, शिक्षणसंबंधी करीत होत्या. २००६ मध्ये तळागाळातील मुस्लीम स्त्रियांमध्ये जगजागरण, प्रबोधन असे काम झाले होते. सर्वसामान्य मुस्लीम महिलांना एकत्र आणणे, संघटित करणे अत्यावश्यक होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सीमांतिक स्त्रिया बेरोजगारी, निरक्षरता, कौटुंबिक न्याय, जातीय ध्रुवीकरण, भेदभाव आदीसंबंधी कृतिशील झाल्या होत्या. 'भारतीय मुस्लीम महिला आंदोलन' संस्थेच्या स्थापनेच्या कामाची पूर्वतयारी २००४ पासून २००६ पर्यंत नियोजित पद्धतीने चालू होती आणि १० जानेवारी २००७ ह्या दिवशी दिल्ली येथे औपचारिकरीत्या ही संस्था स्थापन झाली. त्या स्थापना समारंभास विख्यात स्त्री-पुरुष व देशभरातील ५०० मुस्लीम महिला उपस्थित होत्या. विख्यात व्यक्तींमध्ये डॉ. असगर अली इंजिनिअर, सईदा हमीद, प्रो इम्तियाझ अहमद, सीमा मुस्तफा, प्रो. बाबू मॅथ्यू, डॉ. जिमी दाभी आणि डॉ. एस. एल. जैन यांचा समावेश होता. भारतीय मुस्लीम महिला आंदोलन संस्थेची लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समता, अहिंसा, मानवी हक्क, न्याय ह्या भारतीय संविधानातील मूलभूत मूल्यांवर श्रद्धा आहे. आंदोलनचे मुख्य काम व उद्दिष्ट आहे मुस्लीम महिलांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी समर्थ बनवणे आणि संघटित करणे. सामाजिक, आर्थिक, राजकीय, सनदी, कायदेशीर, मानवी हक्क मिळवून देण्यासाठी सक्षम, सजग, सशक्त म्हणून तयार करणे. कुराणच्या सकारात्मक, उदारमतवादी आशयाचा, विचाराचा मुस्लीम महिलांमध्ये प्रसार करणे. मुस्लीम महिलांचे ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक योगदान नेमके कोणते आहे यासंबंधी सर्वसामान्य मुस्लीम महिलांचे प्रबोधन, जाणीवजागृती निर्माण करणे हे महत्त्वाचे काम सातत्याने करणे. जातीआधारित उतरंड श्रेणी व मुस्लीम महिलांचे सीमांतीकरण ह्यासंबंधी माहिती, वास्तवाचे मार्गदर्शन करणे हे 'आंदोलन'चे काम आहे. त्या दृष्टीने आंदोलन गेल्या १० वर्षांत देशातील १५ राज्यांत हे काम सातत्याने करत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, प्रत्यक्ष तळागाळातील पातळीवर आंदोलनाच्या कामाचा भर आहे.

**'आंदोलन'ची लक्षणीय कामगिरी**

झकिया सोमन व डॉ. नूरजहाँ सफिया नियाझ संस्थापक सदस्य आहेत. महाराष्ट्र, तामिळनाडू, मध्यप्रदेश, ओडिशा, राजस्थान, कर्नाटक, पश्चिम बंगाल, दिल्ली, तेलंगणा, झारखंड, बिहार, केरळ, उत्तर प्रदेश आणि गुजरात अशा एकूण १४ राज्यांत शाखा स्थापन करून जाणीवजागृती, प्रबोधन, कार्यकर्त्यांना प्रशिक्षण, प्रसारमाध्यमामार्फत जनसंपर्क, महत्त्वाच्या प्रश्नांवर लढ्यासंबंधी प्रमुख वृत्तपत्रांना

मुलाखती. दूरदर्शनद्वारा जनसामान्यांमार्फत पोचले आहे. कौटुंबिक न्याय, मुस्लीम वैयक्तिक कायद्यासंबंधी मुस्लीम स्त्रियांची मतेसंबंधी साहित्य, पुस्तिका तयार केल्या आहेत. डिसेंबर २०१४ पर्यंत एकूण सभासदसंख्या दहा लाखांहून अधिक झालेली आहे. आंदोलनची कामे पुढीलप्रमाणे :

- महिला व मुलींसाठी आर्थिक सबलीकरणाच्या हेतूने सात केंद्रे स्थापन केली आहेत.
- मुस्लीम कौटुंबिक कायद्याचा आराखडा तयार करून प्रकाशित केला.
- न्याय असा निकाहनामा तयार करून प्रकाशित केला.
- २५० हून एकतर्फी घटस्फोटित महिलांच्या अनुभवांवर आधारित प्रकाशने प्रसिद्ध केली.
- मुंबईतील हाजी अली दर्ग्यामध्ये स्त्रियांना प्रवेश मिळावा म्हणून याचिका २०१४ मध्ये मुंबई हायकोर्टात व सर्वोच्च न्यायालयात दाखल केल्या व २०१६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे अनुकूल दिला व हा महत्त्वाचा निर्णय आंदोलनने मिळविला.
- एकतर्फी घटस्फोट व अन्य काही तरतुदींविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाखल केला.
- मुस्लीम महिलांना काझी होण्यासाठी, प्रशिक्षणासाठी दाऊल-उलूम निस्वानची स्थापना केली.
- २०१६ मध्ये ५० हजार स्त्रियांच्या सह्यांचा तलाकविरुद्धचा अर्ज राष्ट्रीय महिला आयोगाकडे सादर केला.

भारतीय मुस्लीम महिला आंदोलनची वार्षिक अधिवेशन होतात. स्थापनेच्या नंतर दिल्ली (२००८), लखनौ (२००९). अहमदाबाद (२०१०), कोलकाता (२०११), मुंबई (२०१२), भोपाळ (२०१३), चेन्नई (२०१४), दिल्ली (२०१५) आणि मुंबई (२०१६) अशी १० अधिवेशने झाली. मुंबईच्या अधिवेशनात दहा वर्षांच्या कामगिरीचा अहवाल प्रकाशित करण्यात आला. एकतर्फी घटस्फोटित महिलांच्या वेदनांचा, व्यथांचा, आव्हानांचा आणि कामगिरीचा हा अहवाल होय. भारतीय मुस्लीम महिला आंदोलन हे स्वातंत्र्योत्तर भारतातील सुविहित, सुसंघटित असे आंदोलन स्वयंसेवी संस्था म्हणून पहिलेच आहे.

●


'युनिक फीचर्स'च्या पंचविशीनिमित्त
दोन खणखणीत पुस्तकं

'युनिक फीचर्स'च्या
पत्रकारी प्रयोगाची गोष्ट



आमचा
पत्रकारी
खटाटोप

सुहास कुलकर्णी
₹२००

'युनिक फीचर्स'चे
निवडक महत्त्वाचे लेख



शोधा
खोदा
लिहा

संपादक: सुहास कुलकर्णी
₹२५०

सर्वत्र उपलब्ध

समकालीन प्रकाशन | संपर्क : मुंबई : ९८२०५२५५२३ ● पुणे : ९९२२४३३६०६